लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) मुंबई यास सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाकरीता व्यवस्थापकीय अनुदान मंजूर करण्याबाबत...

# महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय, क्रमांक- एलएएस-२०१५/प्र.क्र.१९०/महामंडळे
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २९/०४/२०१५.

वाचा :- १) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र अर्थसं-२०१५/प्र.क्र.८२/ अर्थसंकल्प, दि.३० मार्च,२०१५
२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन ज्ञापन, क्र. बीजीटी-२०१५/प्र.क्र.५९/अर्थसंकल्प,दि.१० एप्रिल,२०१५.

**शासन निर्णय** :- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) मुंबई मार्फत मातंग समाजाच्या आर्थिक उन्नती करण्यासाठी विविध योजना राबविण्यात येतात. या महामंडळारा सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाकरिता व्यवस्थापन व प्रशासनावरील खर्च भागविण्याकरिता ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) यासाठी रु.१५३८ हजार आणि ३६ सहायक अनुदाने (वेतन) यासाठी रु.५८६५६ हजार अशी एकूण रु. ६०१९४ हजार एवढी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे.

सदर अर्थसंकल्पित तरतूदीपैकी संदर्भिय क्र.१ व २ नुसार दि. १ एप्रिल, २०१५ ते ३१ मे,२०१५ या कालावधीकरीता व्यवस्थापन व प्रशासनावरील खर्च भागविण्याकरीता ३६ सहायक अनुदाने (वेतन) यासाठी रु.९७७६ हजार (अक्षरी रुपये- सत्याण्णव लाख शहात्तर हजार फक्त) एवढे व्यवस्थापकीय अनुदान वितरीत करण्यास शासन खालील अटींवर मान्यता देत आहे :-

i) योजनेतर निधीतील खर्चासाठी शासनाने ठरविलेले निर्बंध काटेकोरपणे अंमलात आणावेत.
ii) व्यवस्थापनावरील खर्च मर्यादित ठेवण्याच्या दृष्टीने कामकाजात सुसूत्रता आणावी.
iii) विविध बाबींवर खर्च केलेल्या रकमांची तपशीलवार माहिती व त्यावर केलेला खर्च याची सविस्तर माहिती शासनास सादर करावी.
iv) महामंडळाने कर्जाच्या वसुलीचे प्रमाण प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रयत्न करावेत.
v) कार्यालयीन खर्चात काटकसर करावी.

२. वरील अनुदानाबाबत सह सचिव/उप सचिव (महामंडळे), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय, मुंबई हे नियंत्रक अधिकारी राहतील. सदर अनुदानाची रक्कम पुढील कार्यवाहीकरिता प्रादेशिक उपायुक्त,मुंबई समाजकल्याण विभाग, नवी मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहे. त्यांना सदर अनुदान म.को.नि.४४ मधील नमुन्यातील देयकान्वये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई यांस संवितरित करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत.

Received on 30/04/15

30/04/15

MS

कृ.मा.प..

३. या बाबींवरील खर्च २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण, ०१ अनुसूचीत जातीचे कल्याण, ८०० इतर खर्च (१०) (००) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई यास सहायक अनुदान (२२२५ २३ १७) ३६ **सहायक अनुदाने** (वेतन) यासाठी रु.९७७६ हजार **(अक्षरी रुपये- सत्याण्णव लाख शहात्तर हजार फक्त)** , मागणी क्रमांक एन-३ या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय, वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र अर्थसं-२०१५/प्र.क्र.८२/ अर्थसंकल्प, दि.३०मार्च,२०१५ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(संजय गुळेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सह सचिव / उप सचिव (महामंडळे), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग ,मंत्रालय, मुंबई
प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नवी मुंबई (दोन प्रती)
व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई,/ठाणे.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
अप्पर कोषागार अधिकारी, कोकणभवन, नवी मुंबई.
वित्त विभाग, (का व्यय १४/अर्थोपाय/अर्थसंकल्प-३/साउ), मंत्रालय, मुंबई.
सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, पाचवा मजला, मुंबई
कार्यासन- अर्थसंकल्प, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
निवड नस्ती का-महामंडळे.